महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-३/मान्यता/२०२४/ 229
दिनांक : .०१.२०२४ 16 JAN 2024

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीताच्या विद्यमान संस्थेतील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद तसेच फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया या शिखर संस्थांच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमाच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत**

**संदर्भ :-** १. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिताच्या मान्यता प्रक्रिये संदर्भातील अधिसूचना /जाहिर सूचना/ परिपत्रके
२. शासन पत्र क्रमांक बैठक-२०२४/प्र.क्र.०२/विशि-३ दि. १२ जानेवारी २०२४
३. संचालनालयाचे पत्र क्र.०२/एनजीपी/मान्यता/एआयसीटीई पीसीआय/२०२४/१२३ दि.१५.०१.२०२४

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी अधिसूचना /जाहीर सूचना/ परिपत्रकाव्दारे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीताच्या नवीन संस्था/अभ्यासक्रम इत्यादीच्या मान्यता प्रक्रियेसंदर्भातील अटी, शर्ती,मानके व मान्यता प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिध्द केले आहे व त्या संबंधीचे Approval Process Handbook प्रसिध्द केले आहे. या शिखर परिषदांच्या अधिपत्याखाली येणाऱ्या संस्थांतील अभ्यासक्रमाच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्र / शासन मान्यतेकरिता खालीलप्रमाणे प्रस्ताव या विभागीय कार्यालयाकडे सादर करण्यात यावे.

**अ) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारीत येणाऱ्या अभ्यासक्रम/संस्थाकरिता**

| अ.क्र. | अर्जाचा प्रकार |
|---|---|
| १ | नविन तांत्रिक संस्था सुरु (Setting up a new Technical Institute) |
| २ | संस्था बंद करुन तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरु करणे. (Institution applied for Closure of the Institution for starting of a new Technical Institution in the same premises in the same year) |
| ३ | पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे. (Conversion of Diploma Level into Degree Level and Vice-versa) |
| ४ | विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) /स्तर (Level) सुरु करणे. (To start New Programme/ Level in the existing Institutions |
| ५ | साईट/लोकेशन मध्ये बदल करणे (Change of Site /Location) |
| ६ | संस्था बंद करणे (Closure of the Institution) |
| ७ | महिला संस्थेचे को-एज्यकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट (Conversion of Women's Institution into Co-ed Institution and Vice-versa) |

| | |
|---|---|
| ८ | ट्रस्ट/सोसायटी/कंपीनच्या नावात/पत्यात बदल करणे (Change in the Name/ Address of the Trust/Society/Company) |

ब ) फॉर्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या अखत्यारीत येणाऱ्या अभ्यासक्रम/ संस्थांकरिता

| अ.क्र | अर्जाचा प्रकार |
|---|---|
| १ | नविन बी.फार्मसी अभ्यासक्रमाची संस्था सुरु करणे (New B.Pharmacy Institute) |
| २ | नविन बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरु करणे (Introduction B.Pharmacy New Course) |
| ३ | संस्थेच्या नावात बदल करणे (Change in Name of Institution (applicable for B.Pharm)) |
| ४ | संस्थेचा पत्ता /ठिकाण बदल करणे (Change of Address / Location of Institution (applicable for B.Pharm)) |
| ५ | अभ्यासक्रम बंद करणे (Closure of course (applicable for B.Pharm)) |
| ६ | संस्था बंद करणे (Closure of Institution (applicable for B.Pharm)) |
| ७ | ट्रस्टच्या नावात बदल करणे (Change in Name of Trust (applicable for B.Pharm)) |
| ८ | नवीन डी फार्मसी अभ्यासक्रम / नवीन संस्था सुरु करणे (New D.Pharmacy Institute / Introduction of D.Pharmacy New Course) |

विद्यमान अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद तसेच फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया या शिखर संस्थांच्या अधिपत्याखालील प्रस्तावित नवीन संस्था व विद्यमान संस्थांपैकी ज्या संस्था संदर्भीय अधिसूचना/जाहीर सूचना/ परिपत्रकानुसार अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद तसेच फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेकडे अर्ज करणार आहेत, अशा संस्थांनी शासनाची मान्यता/शासनाचे ना-हकरत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्धारित केलेले नोंदणी शुल्क डी.डी व्दारे SBI A/C GRAS या नावे भरुन सदचा डी.डी व प्रस्ताव या विभागीय कार्यालयाकडे जमा करावे.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी निर्धारित केलेल्या मानकांप्रमाणे संस्थेकडे पूर्णपणे सद्यस्थितीत वापरायोग्य सोयीसुविधा असतील तसेच समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेली व सक्षम प्राधिकाऱ्यांनी निर्गमित केलेली प्रमाणपत्रे उपलब्ध असतील तरच संस्थांनी आपले प्रस्ताव विभागीय कार्यालयांकडे सादर करावेत. तसेच शासनाची मान्यता/ शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थाची राहील यांची नोंद घेण्यात यावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता